# १५. असे जगावे

- **ऐका. वाचा. म्हणा.**

असे जगावे, छाताडावर आव्हानाचे लावून अत्तर
नजर रोखुनी नजरेमध्ये, आयुष्याला द्यावे उत्तर!

नको गुलामी नक्षत्रांची, भीती आंधळी ताऱ्यांची
आयुष्याला भिडतानाही, चैन करावी स्वप्नांची
असे दांडगी इच्छा ज्याची, मार्ग तयाला मिळती सत्तर
नजर रोखुनी नजरेमध्ये, आयुष्याला द्यावे उत्तर!


पाय असावे जमिनीवरती, कवेत अंबर घेताना
हसू असावे ओठांवरती, काळीज काढून देताना
संकटासही ठणकावून सांगावे, ये आता बेहत्तर
नजर रोखुनी नजरेमध्ये, आयुष्याला द्यावे उत्तर!

करून जावे असेही काही, दुनियेतून या जाताना
गहिवर यावा जगास साऱ्या, निरोप शेवट देताना
स्वर कठोर त्या काळाचाही, क्षणभर व्हावा कातर कातर
नजर रोखुनी नजरेमध्ये, आयुष्याला द्यावे उत्तर!



**गुरू ठाकूर** (१९६८) : प्रसिद्ध कवी, गीतकार, कथाकार. 'नटरंग', 'अगं बाई, अरेच्चा', 'घर दोघांचे', 'टाइमपास' यांसारख्या अनेक प्रसिद्ध मराठी व हिंदी चित्रपटांसाठी गीतलेखन.

ज्यांची इच्छाशक्ती प्रबळ असते त्यांना संकटांतही मार्ग सापडतात. संकटांचा हसून सामना करावा, तसेच आयुष्यामध्ये काहीतरी चांगले कार्य करून जावे, असा संदेश कवीने प्रस्तुत कवितेतून दिला आहे.



**प्र. १. जोड्या लावा.**

| 'अ' गट | 'ब' गट |
|---|---|
| (१) कवेत अंबर घेताना | (अ) जगाला गहिवर यावा. |
| (२) काळीज काढून देताना | (आ) अनेक मार्ग मिळतात. |
| (३) शेवटचा निरोप देताना | (इ) ओठांवर हसू असावे. |
| (४) इच्छा दांडगी असेल तर | (ई) पाय जमिनीवर असावेत. |

**प्र. २. खालील ओळींचा तुम्हांला समजलेला अर्थ लिहा.**

करून जावे असेही काही, दुनियेतून या जाताना
गहिवर यावा जगास साऱ्या, निरोप शेवट देताना

**प्र. ३. संकटात कसे वागावे हे कवितेच्या आधारे तुमच्या शब्दांत लिहा.**

**प्र. ४. 'संकटांना न घाबरता तोंड द्यावे', याविषयी तुमच्या वाचनात आलेल्या एखाद्या प्रसंगाचे वर्णन करा.**

**प्र. ५. कवीने या कवितेतून दिलेला संदेश तुमच्या शब्दांत लिहा.**



## चर्चा करूया.

- आयुष्य जगताना स्वप्ने पाहावी.
- इच्छा असेल तर मार्ग मिळतो.

## खेळूया शब्दांशी.

**(अ) खालील वाक्प्रचार व अर्थ यांच्या जोड्या लावा.**

| 'अ' गट | 'ब' गट |
|---|---|
| (१) नजर रोखणे. | (अ) वास्तवाचे भान ठेवणे. |
| (२) पाय जमिनीवर असणे. | (आ) प्रिय गोष्ट दुसऱ्याला देणे. |
| (३) गगन ठेंगणे होणे. | (इ) निर्भयपणे पाहणे. |
| (४) कवेत अंबर घेणे. | (ई) खूप आनंद होणे. |
| (५) काळीज काढून देणे. | (उ) अशक्य गोष्ट शक्य करणे. |

**(आ) कवितेतील यमक जुळणारे शब्द लिहा.**

(१) अत्तर (२) ताऱ्यांची (३) जाताना

**(इ) खालील अधोरेखित शब्दांसाठी समानार्थी शब्द वापरून ओळी पुन्हा लिहा.**

(१) पाय असावे जमिनीवरती, कवेत अंबर घेताना.

(२) असे जगावे, छाताडावर आव्हानाचे लावून अत्तर.

(३) असे दांडगी इच्छा ज्याची, मार्ग तयाला मिळती सत्तर.

(४) नजर रोखुनी नजरेमध्ये, आयुष्याला द्यावे उत्तर.

(५) स्वर कठोर त्या काळाचाही, क्षणभर व्हावा कातर कातर.



## वाचा.

सर वर्गात आले. त्यांनी निबंधलेखन स्पर्धेचा निकाल सांगितला व म्हणाले, ''मला अनिताचा व सुरेशचा निबंध खूप आवडला. कोणाचा निबंध निवडावा हे मला समजत नव्हते. दोघांच्याही निबंधांतला आशय मनाला विचार करायला लावणारा आणि स्वत:च्या अंतरंगात डोकवायला भाग पाडणारा आहे; पण तरीही मी सुरेशच्या निबंधाची निवड का केली असावी, तर सुरेशचे सुवाच्य, वळणदार अक्षर व शुद्‌ध, बिनचूक लेखन.''

प्रत्येकाच्या अक्षराचे वळण वेगवेगळे असते. काहींचे अक्षर टपोरे, वाटोळे व बाकदार असते. अक्षरांत एकसारखेपणा असतो. दोन अक्षरांतले, दोन शब्दांतले अंतर सारखे असते. अक्षरांचा आकार योग्य असतो. लेखनात स्वच्छता, टापटीप जाणवते. अशा लेखनाला, अक्षरांना एक सौंदर्य प्राप्त झालेले असते, तर काहींचे अक्षर खूप गिचमीड असते. ते वाचनीय नसते. हत्तीचा पाय मुंगीला लावल्यावर जसे दिसेल तसे ते अक्षर असते. असे अक्षर कुणाला वाचावेसे वाटेल का? ते अशुद्‌ध लेखन वाचताना कंटाळा येतो आणि डोळ्यांवर ताण येऊन उगाचच दमणूक होते.

आपले लेखन जेवढे सुवाच्य, सुंदर, वळणदार पाहिजे, तेवढेच शुद्‌ध आणि बिनचूकही असावे. अशा सुंदर अक्षराची देणगी मिळवण्यासाठी अपार मेहनत घ्यावी लागते. सुंदर अक्षर काढण्यासाठी कसोशीने प्रयत्न करावे लागतात. न थकता, न कंटाळता रोजच्या सरावातून अक्षरांना योग्य वळण मिळते. अक्षरांना बाकदारपणा येतो आणि मग हळूहळू मोत्यांसारखी सुरेख अक्षरे कागदावर उमटू लागतात. अक्षर बिघडू नये, यासाठी कधीही अक्षरांकडे डोळेझाक करून चालत नाही. सुंदर अक्षर हा सुरेख दागिना आहे. 'हा दागिना मी कायमस्वरूपी माझ्याजवळ ठेवीन,' असा वसा प्रत्येकानेच घेतला पाहिजे.



## सारे हसूया.



**रमा** : काय गं, गहू कसा आणलास?

**उमा** : पिशवीतून आणला.


**रमा** : तसं नाही गं, म्हणजे कोणत्या भावानं आणला ?

**उमा** : माझ्या चुलतभावानं आणला.



मुलांनो, तुम्ही दररोज मोबाईल व संगणक हाताळत आहात. आजच्या आधुनिक तंत्रज्ञानाच्या युगात विविध सोईसुविधा आपल्याला या माध्यमांद्वारे पुरवल्या जातात.

या सुविधा म्हणजेच वेगवेगळ्या प्रकारची सॉफ्टवेअर ॲप्लिकेशन्स असतात. त्याला तुम्ही ॲप्स असेही म्हणता.




तुम्हांला येथे काही ॲप्सची सांकेतिक चिन्हे दिलेली आहेत. या चिन्हांना काय म्हणतात, ही ॲप्स कशासाठी वापरली जातात, याची माहिती घरातील मोठ्या व्यक्तींकडून जाणून घ्या व लिहा.

### • *विचार करा. सांगा.*

- तुम्हांला मोबाईल/संगणकावरील कोणती ॲप्स वापरायला आवडतात?
- अभ्यास करण्यासाठी अशा एखाद्या ॲपचा वापर करणे तुम्हांला आवडते का? सकारण सांगा.
- या विविध ॲप्सचा उपयोग तुम्हांला आवश्यक वाटतो का? असल्यास/नसल्यास का ते सांगा.
- मोबाईल/संगणकावरील ॲप्स वापरताना तुम्ही कोणती दक्षता घ्याल ?

- तुम्हांला अभ्यास करताना कोणकोणत्या गोष्टी कठीण वाटतात? त्यासाठी कोणती ॲप्स तयार व्हावीत असे तुम्हांला वाटते?